जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.०५/०७/२०२४
## दि.०४/०७/२०२४ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | सिंहगड पो स्टे ३८८/२०२४, भा.न्या.सं.कलम १०९,१९०,१९१(२)(३) सह आर्म ॲक्ट ४(२५) महा.पो.का.कलम ३७(१),१३५ |
| **फिर्यादी** | संदिप चव्हाण वय २५ वर्षे, रा. धायरेश्वर मंदीरा मागे, पोकळे वस्ती धायरी पुणे |
| **आरोपीत** | अनोळखी सात ते आठ इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०३/०७/२०२४ रोजी रात्री २२/४५ वा सुमारास राहत असलेल्या बिल्डींग जवळील सिल्व्हर नेष्ट सोसायटीचे समोरील रस्त्याचे कडेला,धायरी,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी व त्यांचे मित्र असे वर नमुद ठिकाणी गप्पा मारत बसले असताना तेथे चार मोटर सायकल वरुन सात ते आठ अनोळखी इसम हातामध्ये लोखंडी हत्यारे घेऊन आल्याचे फिर्यादी यांनी पाहीले असता ते व त्यांचे मित्र घाबरुन शेजारील सोसायटीमध्ये पळुन गेले असता यातील फिर्यादी हे सोसायटीच्या मागील वॉल कंपाऊंड चे जवळ पाय घसरुन पडले. त्यावेळी फिर्यादी यांचा पाठलाग करणारे सात ते आठ अनोळखी इसम तेथे आले तेंव्हा त्यातील एक जणाने फिर्यादी यांना मन्या कोठे आहे असे विचारले असता फिर्यादी यांनी माहित नसल्याचे सांगितले असता त्यांनी त्यांचे हातातील लोखंडी हत्याराने फिर्यादी यांच्या डोक्याला,दोन्ही पायाला,डाव्या हाताला मारुन,उजव्या पायाचे नडगीला फ्रॅक्चर करुन,डाव्या हाताचे दुसरे बोटावर वार करुन कट करुन फिर्यादी यांना जिवे ठार मारण्याचा प्रयत्न केला. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी.श्रीकांत सावंत मो.नं.९५५२५५६४२४ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | बंडगार्डन पो स्टे १७७/२०२४,भा.न्या.सं कमल ३०९(४) |
| **फिर्यादी** | एक महिला वय १८ वर्षे रा.कॅम्प पुणे |
| **आरोपीत** | अज्ञात इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०३/०७/२०२४ रोजी १२/३० वा.चे दरम्यान ए.बी.एस फिटनेस जिम नेहरू मेमोरियल हॉल पुणे |
| **तपशिल** | यातील नमुद इसम याने नमुद ठिकाणी फिर्यादी यांचे पाकीटातील ५००/-रू.बळजबरीने काढून घेवुन फिर्यादी यांचे बोटातील अंगठी ओढण्याचा प्रयत्न केला. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी.तांगडे ९०२१३६६०६५ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हडपसर पो स्टे१०८३/२०२४,भा.न्या.सं.कलम.१८९(२),१८९(४),१९०,१९१(२),३२४(४),(५) आर्म ॲक्ट कलम ४,२५, क्रि.लॉ. अमेंडमेंट ॲक्ट कलम ३,७ मपोका कलम ३७(१)सह १३५ |
| **फिर्यादी** | एक इसम वय ३१ वर्षे, रा.डेरे कंपनीजवळ,फुरसुंगी, पुणे |
| **आरोपीत** | चार ते पाच इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०४/०७/२०२४ रोजी ००.१५ वा.।चे सुमा.संकेत विहार,मेन रोड फुरसुंगी, हडपसर पुणे |

| | |
|---|---|
| **तपशिल** | यातील नमुद इसमांनी नमुद ठिकाणी त्यांचे हातातील लोखंडी शस्त्रांनी फिर्यादी व इतर इसमांच्या वाहनांच्या काचा फोडून नुकसान करून सदर भागात दहशत निर्माण केली |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी.जाधव मो.नं.९८७०३८०२३७ |
| **४** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | भारती विद्यापीठ पो स्टे ५७२/२०२४ भा.न्या.सं कलम ३०९(४) ३(५) |
| **फिर्यादी** | एक महिला वय ५९ वर्षे, रा.चितामणी ज्ञानपीठ जवळ, आंबेगाव पठार पुणे |
| **आरोपीत** | मोटार सायकलवरील दोन अज्ञात इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०४/०७/२०२४ रोजी सकाळी ०५/३० वा. ते ०५/३५ वा चे सुमा.हिंदुस्थान ग्रेनाईट मार्बल चे दुकाना समोर कात्रज रोड कडे जाणाऱ्या सर्व्हीस रोड वर आंबेगाव बु.पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हया त्यांचे मैत्रिणी सोबत नमुद ठिकाणावरून पायी जात असताना,नमुद इसमांनी दुचाकीवरून फिर्यादी यांचे जवळ येवुन,फिर्यादी यांचे गळयातील ५०,०००/-रू.कि.चे सोन्याचे मिनी गंठण हिसका मारून चोरून नेले |
| **त.अंमलदार** | म.पो.उप.निरी.सोनाली मिठारे मो.नं. ९६६५२१०३४५ |
| **५** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | डेक्कन पो स्टे १०२/२०२४,भादविक ४२०,४६७,४६८,४७१,३४ |
| **फिर्यादी** | एक इसम वय ४८ वर्षे, रा.शिक्षक भवन,नवी पेठ,पुणे |
| **आरोपीत** | तीन इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१९/०६/२०२४ रोजी १५/०० ते १६/०० वा.चे दरम्यान महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, आघारकर संस्थेच्या मागे, भांबुर्डा पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे नमुद ठिकाणी महाराष्ट्र राज्य परिक्षा परिषदेवर उप-आयुक्त म्हणुन नियुक्तीस असुन नमुद तीन इसमापैकी एका महिलेने नमुद ठिकाणी येवुन फिर्यादी यांचे समक्ष बनावट शासकीय लेटरहेडवर फिर्यादी यांचे नाव व नावाची बनावट स्वाक्षरी/बनावट शिक्कयाचे पत्र सादर केले असता फिर्यादी यांनी सदर पत्राबाबत विचारणा केली असता सदरचे पत्र हे नमुद दोन इसमांनी दिल्याचे सांगितल्याने सदरचे बनावट पत्र हे नमुद इसम यांनी संगनमत करुन स्वतःच्या फायदयासाठी गैरवापर करुन शासनाची फसवणुक करण्याचा प्रयत्न केला. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी.महेश भोसले मो.नं.९८५०१५११०० |
| **६** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | शिवाजीनगर पो स्टे १७४/२०२४,भादविक ३०४(अ),२७९ |
| **फिर्यादी** | एक माहिला वय २५ वर्षे रा.येवलेवाडी पुणे |
| **आरोपीत** | दुचाकी गाडी चालक(अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२७/६/२०२४ रोजी २३/४५ वा.सुमारास पुणे महानगरपालिकेजवळ । |
| **तपशिल** | यातील नमुद इसम हा फिर्यादीची दुचाकी चालवित असताना फिर्यादी यांचा भाऊ वरद शैलेंद्र नाईक रा. येवलेवाडी पुणे हा नमुद दुचाकी गाडी चालकाच्या पाठिमागे बसला असताना नमुद चालकांने वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून,हयगयीने,अविचाराने नमुद ठिकाणी रस्त्याचे परिस्थीतीकडे दुर्लक्ष करुन गाडी चालुवन फिर्यादीच्या भावाचे मृत्युस कारणीभुत झाला |
| **त.अंमलदार** | म.पो.उप.निरी.कांचन काळे मो.नं.९९७०१०७५४९ |
| **७** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हडपसर पो स्टे १०९१/२०२४,भादविक ४१९,४२०,माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(ड) |
| **फिर्यादी** | एक इसम वय ४० वर्षे, रा. फुरसुंगी, पुणे, |
| **आरोपीत** | अज्ञात मोबाईल धारक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२३/०६/२०२४ रोजी ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांना नमुद अज्ञात मोबाईल धारक हे फेडेक्स मधुन बोलत असल्याचे सांगुन तुमच्या बँक खात्यामधुन मनी लॉड्रींग झाले आहे असे सांगुन बँक खाती पडताळण्याच्या बहाण्याने फिर्यादीची कोणतीही परवानगी न घेता कोणत्याही कागदपत्राची पडताळणी न फिर्यादीची १०,६०,०००/- रूपये ट्रान्सफर करून घेतले. |

| | |
|---|---|
| **त.अंमलदार** | पोलीस निरीक्षक(गुन्हे)श्रीमती मंगल मोढवे मो.नं. ९८२३१७०२६२ |
| ८ | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | चतुंश्रृंगी पो स्टे ५९६/२०२४,भा.न्या.सं.कलम१०६(१),२८१ मो.वा.का.क१८४,१७७/११९,१३२ (१)(क) |
| **फिर्यादी** | प्रदीप पांढरकर, ६४ वर्षे रा.सुभाष नगर, आर्णी रोड, यवतमाळ |
| **आरोपीत** | अज्ञात डंम्पर चालक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०४/०७/२०२४ रोजी स. ९/३० वा.चे सुमा.योगी पार्कजवळ ननवरे चौक बाणेर पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद इसमाने त्याचे ताब्यातील डंम्पर हा वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून, हयगयीने,अविचाराने व भरधाव वेगात चालवुन,नमुद ठिकाणी फिर्यादी यांचे जावई अभिषेक मनोज सरनाईक वय ३४ वर्षे रा.सुसगाव पुणे यांचे मोटार सायकलला जबर ठोस मारून, गंभीर जखमी करून,त्याचे मृत्युस कारणीभुत झाला. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी.आर आर पाटील मो.नं.८४५९३९५०३४ |
| ९ | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वानवडी पो स्टे ४१७/२०२४ भा.न्या.स.कलम ३०३(२) |
| **फिर्यादी** | एक इसम वय ४९ वर्षे रा.पुना कॉलेजजवळ,कॅम्प पुणे |
| **आरोपीत** | अज्ञात इसम(अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०४/०७/२०२४ रोजी पहाटे ०४/३० वा.चे सुमा.रक्षालेखा प्रधान नियंत्रक कार्यालय,गोळीबार मैदान,पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे नमुद ठिकाणी वरिष्ठ लेखा अधिकारी म्हणुन काम पाहत असुन नमुद ठिकाणावरील १०,०००/- रु.किं.चे चंदनाचे झाड कोणीतरी अज्ञात चोरटयाने कापुन चोरी करुन नेले. |
| **त.अंमलदार** | पोलीस अंमलदार कलजी ०२०/२६८२४९८१ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**